# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १० एप्रिल, २०१५ / चैत्र २०, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **परिवहन मंत्री** | |
| **(३)** | **उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २२**

---

### गुजरात मधील विविध दुध संघ महाराष्ट्रातून बेकायदेशीर दुध संकलन करीत असल्याबाबत

**(१) * १५८३५ श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुजरात मधील गोध्रा, सुरत व बलसाड येथील दुध संघ महाराष्ट्रातून बेकायदेशीरपणे दुध संकलन करीत असल्यामुळे महाराष्ट्रातील अनेक दुध संघाचे कोटयवधी रुपयांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अशा दुध संघावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशा आशयाच्या तक्रारी राज्यातील काही सहकारी दूध संघांकडून शासनास प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी सहनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) यांनी प्रशासकीय स्वरुपाची चौकशी व अंतरिम सुनावणी घेऊन गुजरात मधील ५ दूध संघांना तक्रार अर्जाची सुनावणी संपेपर्यंत महाराष्ट्र राज्यामध्ये दूध संकलन करण्यास दि.१०.२.२०१५ रोजीच्या आदेशान्वये मनाई करण्यात आली होती. तद्नंतर सदर ५ प्रतिवादी संघांना त्यांची बाजू मांडण्यासाठी व अपिलाकरीता कालावधी मिळावा म्हणून सहनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) यांनी स्वतःच्या मनाई आदेशास दि.१३.२.२०१५ रोजीच्या आदेशान्वये अंतरिम स्थगिती आदेश पारित केले.

दरम्यान याच संदर्भात चौकशी त्वरीत व समय मर्यादेत पूर्ण करण्याच्या प्रमुख मागणीसह व अन्य मागण्यांसह काही सहकारी दूध संघांनी मा. उच्च न्यायालयात याचिका क्र.२०७२/२०१५ व २०७७/२०१५ दाखल केल्या आहेत. सदर याचिका न्यायप्रविष्ठ आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## श्रीगोंदा, कर्जत (जि. अहमदनगर) व मोहोळ (जि. सोलापूर) या तालुक्यात भिमा व सिना नदीतून वाळुची तस्करी होत असल्याबाबत

**(२) * ९१५५ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा, कर्जत (जि. अहमदनगर) तालुक्यातील भीमा नदीच्या पात्रामध्ये खेड्यापासून सिध्दटेक पर्यंत येणा-या सर्व ठिकाणी नदी पात्रामधून हजारो ब्रास वाळूची चोरी होत असल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, भिमा व सिना नदीवर (ता.मोहोळ, जि.सोलापूर) वाळूची तस्करी होवू नये यासाठी बसविण्यात आलेले सी.सी.टी.व्ही. (कॅमेरे) बंद करुन अधिका-यांशी संगनमत करुन वाळूची तस्करी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा व कर्जत तालुक्यात वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतुकीची काही प्रकरणे निदर्शनास आली आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(२) सोलापूर जिल्ह्यात मोहोळ तालुक्यातील सन २०१३-२०१४ मध्ये लिलावात गेलेल्या ४ वाळूगटामधून लिलावधारकांकडून होणा-या वाळू उत्खननावर नियंत्रण ठेवण्यासाठी सी.सी.टि.व्ही कॅमेरे बसविण्यात आले होते. लिलावाचा कालावधी संपल्यानंतर सदर वाळूगटामधून वाळूचे उत्खनन बंद करुन. सी.सी.टि.व्ही कॅमेरे काढण्यात आले, ही वस्तुस्थिती आहे.

(३) व (४) गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतुकीस आळा घालण्यासाठी गठीत केलेल्या भरारी पथकांनी सन २०१४-२०१५ मध्ये केलेल्या तपासणीत श्रीगोंदा तालुक्यात वाळूच्या अवैध वाहतूकीच्या ७० प्रकरणात रुपये १५,७७,९०५/- दंड वसुल करण्यात आला असून २६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कर्जत तालुक्यात वाळूच्या अवैध वाहतूकीच्या २० प्रकरणात रुपये ४,८६,१६८/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

तसेच, सन २०१४-२०१५ मध्ये मोहोळ तालुक्यातील भिमा व सीना नदीपात्रातून वाळूची अवैध वाहतुक करणा-यांकडून रुपये ८,५४,४२०/- इतका दंड वसूल करण्यात आला असून, १० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई रोड, आनंदनगर येथे ट्रान्सफार्मरचा स्फोट होऊन पादचारी गंभीर जखमी झाल्याबाबत

**(३) * १५८२४ श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई रोड, आनंदनगर येथे दिनांक १९ डिसेंबर, २०१४ रोजी ट्रान्सफार्मरचा भीषण स्फोट झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्फोटामध्ये रस्त्यावरुन जाणारे चार पादचारी भाजून जखमी झाले असून त्यातील दोन जण अत्यवस्थ असून त्यास उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले, तसेच या ट्रान्सफार्मच्या आवारात पार्क केलेल्या मोटार सायकली पूर्णतः जळून खाक झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्फोट होण्यापूर्वी या ट्रान्सफार्मरमधून सतत ऑईलची गळती सुरु असल्याची बाब तेथील नागरिकांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या स्थानिक अधिका-यांच्या निदर्शनास आणून दिली होती, परंतु वरिष्ठ अधिका-यांनी या

ऑईल गळतीकडे गांभिर्याने लक्ष न दिल्यामुळे स्फोट झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या स्फोटाची सखोल चौकशी करण्यात येऊन त्यास जबाबदार असणा-या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, या स्फोटात जखमी झालेल्यांना औषधोपचार व आर्थिक मदत देण्यात आली आहे वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.

(२) स्फोटामध्ये दोन पादचारी गंभीर जखमी झाले होते व दोन पादचा-यांना किरकोळ भाजल्याचा जखमा होत्या त्यांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आलेले होते व ट्रान्सफार्मरच्या लगत एक मोटर सायकल व एक सायकल जळून पुर्ण खाक झालेली होती. गंभीर जखमी झालेल्या दोन पादचा-यांचा उपचारादरम्यान रुग्णालयात मृत्यु झाला.

(३) ऑईल गळती बाबतची तक्रार स्थानिक कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

(४) सदर स्फोटाबाबतची चौकशी विद्युत निरीक्षकांनी पुर्ण केली असून त्यांच्या अहवालानुसार सदरचा स्फोट हा रोहित्राच्या अंतर्गत दोषामुळे झालेला आहे.

(५) महावितरण कंपनीच्या नियमानुसार मयताच्या वारसांना आर्थिक मदत रु.२,००,०००/- प्रत्येकी व किरकोळ जखमीना रु.१५००/- प्रत्येकी देण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विष्णुनगर (ता.जि.नांदेड) भागात डी.पी. वरून कमी अधिक दाबाचा वीज पुरवठा झाल्याने नागरिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याबाबत**

**(४) * १२५१४ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विष्णुनगर (ता.जि.नांदेड) भागात डी.पी.नंबर.२१२ वरून कमी अधिक दाबाचा वीज पुरवठा होत असल्याने काही घरातील इलेक्ट्रॉनिक उपकरणे, टीव्ही बंद पडून ट्रान्सफॉर्मर जळल्याने प्रचंड स्फोट होऊन परिसरातील ४०-५० घरांमधील टीव्ही, फ्रीज, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, पंखे, कुलर एसीसारख्या वस्तू अचानक बंद पडून मोठे नुकसान झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) होय.

(३) सदर नादुरुस्त रोहित्र त्वरीत बदलून तेथील वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला. सदर घटनेची पुढील तपासणी करीता विद्युत निरिक्षक, नांदेड यांना कळविण्यात आलेले आहे. विद्युत निरीक्षकांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात औद्योगिक विजेच्या दरात वाढ झाल्याबाबत**

**(५) * ६४१७ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने वीज सवलतीपोटी ७०६ कोटीचे अनुदान काढून घेतल्याने औद्योगिक विजेच्या दरात वाढ झाल्याने त्या निषेधार्थ कोल्हापूर येथील उद्योजकांनी दिनांक १२ ते १४ जानेवारी, २०१५ रोजी आपले उद्योग बंद ठेवले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योजकांना वीज दरात सवलत न दिल्यास राज्यव्यापी बंदचा इशाराही दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही. कोल्हापूरच्या दिनांक १०.१.२०१५ रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रामध्ये दिनांक १२ ते १४ जानेवारी, २०१५ रोजी उद्योग बंद ठेवण्याबाबत इशारा उद्योजकांनी दिलेला होता.

(२) नाही.

(३) औद्योगिक ग्राहकांना देण्यात येणारी शासकीय सवलत बंद झाल्यामुळे विद्युत नियामक आयोगाने लागू केलेले अंतरिम वीज दर औद्योगिक ग्राहकांना लागू होऊन

वीज दरात साधारणतः २०% वाढ झालेली होती. आयोगाच्या दिनांक ३.३.२०१४ अन्वये लागू केलेले अंतरिम वीजदर व अतिरिक्त वीज आकारातील जनको-१ हे दोन आकार फेब्रुवारी, २०१५ मध्ये संपुष्टात आल्यामुळे औद्योगिक दरामध्ये अंदाजे १२% कपात झालेली आहे. मार्च, २०१५ मध्ये जनको-१ व ट्रॉन्सको आकार संपुष्टात असल्यामुळे एप्रिल, २०१५ च्या औद्योगिक वीज बिलामध्ये जवळजवळ १९ % कपात होणार आहे. विद्युत नियामक आयोगाने मंजूरी दिल्यानंतर नवीन दर लागू होतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**वरूड व धामणगांव (जि.अमरावती) तालुक्यात तसेच वर्धा नदीच्या मुगाली घाटावरुन (जि.वर्धा) रेतीची तस्करी होत असल्याबाबत**

**(६) * १२५५० प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरूड तालुक्यात (जि.अमरावती) येथे नियमबाह्यपणे रेती उत्खनन होत असल्याप्रकरणी तहसिलदार यांनी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अनेकदा तक्रारी करूनही आजवर संबंधितांवर कोणतीच कारवाई झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, धामणगांव तालुक्यातील (जि.अमरावती) लिलाव झालेल्या रेतीघाटातून रेती उत्खनन करु नये असा शासन निर्णय असूनही पोकलेनच्या साह्याने नियमबाह्य रेती उपसा सुरु असून त्याकडे संबंधित अधिका-यांनी केलेल्या दुर्लक्षामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) तसेच, वर्धा नदीच्या मुगाली घाटावरुन (जि.वर्धा) गेल्या काही दिवसांपासून मोठया प्रमाणात अवैध रेती उत्खनन सुरु असल्याचे दिनांक ११/१/२०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने यासंदर्भात चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) तहसिलदार, वरुड यांनी नियमबाह्य रेती उत्खननाबाबत कोणतीही तक्रार उपविभागीय अधिका-यांकडे केल्याचे आढळून आले नाही.

(२) धामणगांव तालुक्यातील लिलाव केलेल्या रेती घाटातून रेती उत्खनन करु नये असा कोणताही शासन निर्णय काढण्यात आलेला नाही. तसेच सदर भागात माहे

जानेवारी, २०१५ वा त्या सुमारास पोकलेनच्या सहाय्याने रेती उपसा सुरु असल्याची बाब दृष्टोपत्तीस आलेली नाही.

(३) वर्धा जिल्ह्यातील वर्धा नदीपात्रात मुगाली नावाचा रेतीघाट अस्तित्वात नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील मच्छिमार संस्थांनी डिझेल खरेदीतील परताव्याच्या रक्कमेचा मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याबाबत**

**(७) * १५९८७ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मच्छिमार संस्थांनी बाजार भावाने डिझेल खरेदी केल्यानंतर आणि त्यांनी खरेदी केलेल्या डिझेल खरेदीच्या पावत्या शासनाकडे जमा केल्यावर शासनामार्फत परताव्याची रक्कम परत दिली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुरुड तालुक्यातील (जि.रायगड) महालक्ष्मी मच्छिमार विविध कार्यकारी संस्थेच्या पदाधिका-यांनी स्वतःची यंत्रणा राबवून डिझेल खरेदीतील परताव्याच्या रक्कमेचा मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ च्या दुस-या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची प्रतिज्ञापत्र व पुराव्यासह तक्रार सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय, रायगड यांच्याकडे श्री.अशोक नरहरी गिदी यांनी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) नाही.

(३) तक्रार प्राप्त हे खरे आहे. मात्र प्रतिज्ञापत्र व पुरावे दिलेले नाहीत.

(४) चौकशीत गैरव्यवहार आढळून आलेला नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भागाईवाडी (ता.शिराळा, जि.सांगली) येथील डोंगरावरील गवतास वीज तारांच्या स्पार्किंगमुळे लागलेल्या आगीत महिलेचा झालेला मृत्यू**

**(८) * १५६२९ श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भागाईवाडी (ता.शिराळा, जि.सांगली) येथील डोंगरावरील गवतास वीज तारांच्या स्पार्किंगमुळे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये आग लागून त्या आगीत श्रीमती बाळाबाई यशवंत खोत (वय ६५) या महिलेचा होरपळून मृत्यू झाला असून त्यांचे पती श्री. यशवंत खोत (वय ७०) हे भाजून गंभीररित्या जखमी झाले आहेत, तसेच त्यांचे सुमारे ६० एकरातील असलेले गवत जळून खाक झाल्याने ३० लाख रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आग महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या कर्मचा-यांच्या निष्काळजीपणामुळे लागली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नुकसान झालेल्या खोत कुटुंबियास भरपाई देण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) तालुका शिराळा, जि.सांगली येथील भागाईवाडी डोंगरावरील गवतास वीज तारांच्या स्पार्किंगमुळे फेब्रुवारी, २०१५ मध्ये आग लागून त्या आगीत श्रीमती बाळाबाई यशवंत खोत (वय ६५) या महिलेचा होरपळून मृत्यू झाला असून त्यांचे पती श्री.यशवंत खोत (वय ७०) हे भाजून गंभीररित्या जखमी झाले हे खरे आहे.

तसेच जळीत गावताच्या नुकसानाची रक्कमेबाबत तालुका कृषि अधिकारी यांचे प्रमाणपत्र पंचनामा अद्याप अप्राप्त आहे.

(२) नाही. सदर दुर्घटना नैसर्गिक कारणामुळे झाली आहे.

(३) जळीत गवताच्या नुकसानाची रक्कमेबाबत तालुका कृषि अधिकारी यांचे प्रमाणपत्र पंचनामा व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे इतर आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्यावर नुकसान भरपाई देण्यात येईल. या घटनेतील मृत्यूमूखी पडलेल्या शेत मजुरांच्या कुटूंबियांना महावितरणकडून आर्थिक मदत देण्यासंबंधीची प्रक्रिया चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयातील आरमोरी येथील फ्रेन्डस दुग्ध उत्पादक सहकारी संस्थेने शेतक-यांची केलेली फसवणूक

**(९) * १४२४९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील आरमोरी येथील फ्रेन्डस दुग्ध उत्पादक सहकारी संस्था मर्या. आरमोरी र.नं.३५८ चे अध्यक्ष, सचिव आणि जिल्हा दुग्ध विकास अधिकारी, गडचिरोली यांनी संगनमत करुन बनावट कागदपत्राच्या आधारे शेतक-यांची फसवणूक करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याची माहिती दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीनुसार काय कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, याबाबत होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशतः खरे आहे.

गडचिरोली जिल्हयातील मौजे आरमोरी येथील फ्रेन्डस दुग्ध उत्पादक सहकारी संस्थेत झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करुन दोषींवर कार्यवाही करण्याबाबत संस्थेच्या सभासदांनी दि.५.१०.२०१३ रोजी आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास यांच्या कार्यालयात निवेदन दिले होते.

(२) होय,

सदर प्रकरणी जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, वर्धा व प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, नागपूर यांचेमार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे. तसेच सहकार विभागांतर्गत लेखापरीक्षण श्रेणी-१ (फिरते पथक), सहकारी संस्था (पदुम), चंद्रपूर यांचेमार्फत वैधानिक लेखा परिक्षण करण्यात आले असून प्रशासकीय विशेष अहवाल सादर करण्यात आला आहे.

सदर अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम ७२ मधील तरतूदीनुसार संबंधीत संचालक/पदाधिकारी व अधिका-यांच्याविरुध्द शाहनिशा करुन आरोप ठेवून संबंधितांवर वैयक्तिक व सामुहिकरित्या जबाबदारी निश्चित करुन जी रक्कम ठरविली जाईल ती रक्कम संस्थेस भरणेविषयी आदेश पारीत करावेत, असे आदेश सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, देसाईगंज, गडचिरोली यांना सहायक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), गडचिरोली यांनी दि.२२.१.२०१५ रोजी दिले आहेत.

जिल्हा दुग्ध विकास अधिकारी, गडचिरोली यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून त्याअनुषंगाने त्यांना दि.३१.१.२०१५ रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे बेणापूर (ता.खानापूर, जि.सांगली) येथील देवस्थान जमीन पवनचक्की कंपनीने अनधिकृतपणे ताब्यात घेतल्याबाबत**

**(१०) * १५२७२ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यामधील मौजे बेणापूर येथील गट नंबर ४१० मध्ये मारुती देवस्थान जमीन पवनचक्की कंपनीने शासनाची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे ताब्यात घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार पवनचक्की कंपनीविरोधात शासनाने काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३)

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुका मौजे बेणापूर येथील ग.नं.४१० ही जमीन देवस्थान इनाम वर्ग-३ ची असून सदर जमिनीच्या मयत वहिवाटदाराच्या वारसाच्या संमतीने मारुती विंड कंपनीने वर नमूद गटातून १० गुंठे क्षेत्रात अंदाजे ४५० फूट लांब व २५ फूट रुंद असा रस्ता तयार करुन त्याचा वापर केला आहे. सदरची जमीन ही देवस्थान इनाम वर्ग-३ ची असल्याने सक्षम प्राधिकारी यांची कोणतीही पुर्वपरवानगी न घेता वरील जमिनीचा वापर रस्त्यासाठी केला असल्याने त्याबाबत उपविभागीय अधिकारी, विटा यांचेकडून चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हयातील पाटोदा येथील वीज वितरण कंपनीच्या निष्काळजीपणामुळे युवकाला झालेला अपघात

**(११) * ११३७७ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील पाटोदा येथील वीज उपकेंद्रात कोब्रा कंपनीच्या ठेकेदारी गटात लाईनवर नवीन वायर टाकण्याचे काम करणा-या एका तरुणास वीज वितरण कंपनीच्या निष्काळजीपणामुळे अपघात होऊन दोन्ही हात गमवावे लागल्याची गंभीर घटना दिनांक १२ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर तरूणास जास्तीत जास्त आर्थिक व वैद्यकीय मदत मिळण्यासाठी शासनामार्फत तातडीची कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशतः खरे आहे.

सदर घटना दिनांक २३ नोव्हेंबर, २०१२ रोजी घडली आहे.

(२) होय,

(३) शासकीय विद्युत निरीक्षक, नाशिक यांच्या अहवालानुसार सदर अपघातास कनिष्ठ अभियंता व उप यंत्रचालक हे जबाबदार असल्याचे चौकशीअंती निष्पन्न झाले. पाटोदा उपकेंद्राचे उपयंत्रचालक यांना कार्यकारी अभियंता, मनमाड यांनी निलंबीत केले असून त्यांची खाते अंतर्गत चौकशी करुन त्यांचा निलंबन कालावधी शिक्षा म्हणून ग्राह्य धरण्यात आला असून त्याची वार्षिक वेतन वाढ एक वर्षाकरिता संचयी परिणामाने रोखण्याची शिक्षा केली आहे. कनिष्ठ अभियंता यांच्यावर आरोपपत्र दाखल करण्यास आले आहे.

महावितरण कंपनीकडून दिनांक २९.११.२०१२ रोजी तात्काळ आर्थिक मदत रु.५०००/- देण्यात आली असून सदर युवकाने नुकसान भरपाई मिळणसाठी प्रथम वर्ग कामगार न्यायालय, नाशिक यांचेकडे दावा दाखल केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**कल्याण- डोंबिवली (जि.ठाणे) तसेच माण (जि.सातारा) येथील वीज ग्राहकांकडून वाढीव वीजबिल आकारण्यात येत असल्याबाबत**

**(१२) * १४९७७ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, कल्याण, डोंबिवली (जि.ठाणे) तसेच माण (जि.सातारा) येथे वीज वापराच्या मीटर वाचनामध्ये चुकीच्या नोंदी करून वीज ग्राहकांकडून वाढीव वीज बिल आकारण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उक्त चौकशीनुसार वाढीव बिले पाठविणा-या संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) वीज ग्राहकांना त्यांच्या विद्युत वापरानुसार विद्युत देयके दिली जातात. परंतु माहे जानेवारी, २०१५ मध्ये कल्याण शहराअंतर्गत ३३४ वीज ग्राहकांचे मीटर वाचन चुकीचे झाल्याने त्यांची देयके चुकीची गेलेली आढळून आलेली आहेत व त्यामध्ये दुरुस्ती करुन दिलेली आहे. डोंबिवली विभागामध्ये उपविभाग ३ अंतर्गत Hand Held Unit च्या तांत्रिक दोषामुळे २४ वीज ग्राहकांचे प्रत्यक्ष मीटर वाचन पध्दतीने रिडींग घेण्यात आले त्यामुळे सदर वीज ग्राहकांना ३० ऐवजी ३१ ते ३८ दिवसांची वीज देयके गेली होती. त्यांची दुरुस्ती पुढील महिन्यांच्या वीज देयकांमध्ये करण्यात आली आहे.

(२) होय.

(३) मीटर वाचन एजन्सीच्या चुकीच्या वाचनाबद्दल कामाच्या आदेशातील तरतूदी नुसार ठाणे जिल्हा अंतर्गत तसेच माण, जि.सातारा अंतर्गत मीटर वाचन एजन्सीस अनुक्रमे रु.२४,३२५ व रु.३५०० दंड आकारण्यात आला असून सदर दंडाची रक्कम संबंधित एजन्सीच्या देयकातून वसुल करण्यात कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांनी संशोधन व शैक्षणिक उद्देशाने संपादित केलेली जमीन विनावापर पडून असल्याबाबत

**(१३) * १५६८१ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोलाकडे संशोधन व शैक्षणिक उद्देशाने संपादित केलेली शेतक-यांची जमीन मोठ्या प्रमाणात ब-याच वर्षांपासून विनावापर पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर संपादित जमीन विना वापर पडुन असल्याने पडीत झाली, हे खरे आहे काय,

(३) डॉ.पं.दे.कृ. विद्यापीठाकडे विना वापर पडून असलेली जमीन मूळ शेतक-यांना परत करण्यासाठी वा भाडे तत्वावर लागवडीसाठी देण्यासाठी वारंवार मागणी केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, विना वापर पडून असलेली पडीत झालेली जमीन कसण्यायोग्य करण्यासाठी व शैक्षणिक प्रयोजनात वापरण्यासाठी काय कार्यवाही करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचेकडे एकूण ५०२१.७६ हेक्टर जमीन आहे. त्यापैकी ३०६.१५ हे. एवढी जमीन पडीत आहे. या जमिनीमध्ये चराई क्षेत्र, तलाव क्षेत्राचा समावेश आहे. तसेच जमिनीचा काही भाग उताराचा, पाणथळ व गोटाडी स्वरुपाचा असल्याने पडीत आहे.

(३) अंशतः खरे आहे.

सर्वोदय शेतकरी समस्या निवारण समिती, अकोला यांनी विद्यापीठाची जमीन बिजोत्पादनासाठी खाजगी कंपन्यांना न देता मूळ शेतक-यांस परत देता यावी याकरिता शासनाकडे मागणी केली होती.

(४) जमीन सुधारणेची कार्यवाही सुरु आहे. त्याअंतर्गत ही जमीन कसण्यायोग्य करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुर्डुवाडी (ता.माढा, जि.सोलापूर) येथील मुळ मालमत्ता धारकांची नावे भोगवटादार लावल्याने या मालमत्तेची खरेदी विक्री होत नसल्याबाबत

**(१४) * १६२४० श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्डुवाडी (ता.माढा, जि.सोलापूर) येथील ९१७ मूळ मालमत्ता धारकांची नावे भोगवटादार म्हणून लावल्याने या मालमत्तेची खरेदी विक्री होत नसल्याचे, बांधकामास परवानगी मिळत नसल्याचे तसेच बँकेचे कर्ज मिळत नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मिळकती मुळ मालमत्ताधारकांच्या नावावर नियमानुकूल करण्याबाबत मंत्रीमंडळाने दिनांक ६ ऑगस्ट, २००९ रोजी निर्णय घेवूनही अद्याप शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मालमत्ता नियमानुकूल करण्याचे अधिकार महसूल उपविभागीय अधिकारी यांना देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार निवेदने देवूनही शासनस्तरावर जाणीवपूर्वक कार्यवाही प्रलंबित ठेवली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन मिळकती मालमत्ताधारकांच्या नावे करण्याबाबत तसेच जाणीवपूर्वक विलंब करणा-या मंत्रालयीन संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) मौजे कुर्डुवाडी, मा.माढा येथे नगर भूमापन पध्दती लागू करताना ९१७ मालमत्तेच्या आखीव पत्रिकेवर धारक सदरी "महाराष्ट्र शासन" नमूद असून इतर हक्कात भोगवटादारांची नावे नमूद आहेत. सदर मिळकती शासनाच्या असल्याने त्यावरील अतिक्रमणदारांच्या नावाची नोंद आखीव पत्रिकेत "इतर हक्कात" करण्यात आली आहे.

या प्रश्नाविषयी दि.६/८/२००९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार शासन ज्ञापन दि.३१/०८/२००९ व त्याचे शुध्दीपत्रक दि.१८/०२/२०१२ अन्वये ४ भोगवटदारांची प्रकरणे नियमित करण्यात आली आहेत. एकूण ४५० प्रकरणे अतिक्रमण नियमित करण्यासाठी प्राप्त झालेली असून उपविभागीय अधिकारी स्तरावर प्रकरणनिहाय छाननी सुरु आहे.

(३), (४) व (५) प्रश्नाधीन प्रकरणी उपविभागीय अधिकारी यांना अतिक्रमण नियामानुकूल करण्यासंदर्भात अधिकार प्रत्यायोजित करण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर तपासण्यात येत आहे.

-----------------

## अंबड, घनसावंगी, भोकरदन, जाफराबाद (जि.जालना) या तालुक्यातील नदीपात्रातून तसेच पूर्णा (ता.जळगांव-जामोद, जि.बुलढाणा) येथे नदी पात्रात अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत

**(१५) *८६९५ श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबड, घनसावंगी, भोकरदन आणि जाफराबाद (जि.जालना) या तालुक्यातील नद्यांवर वाळू माफिया अवैध वाळू उपसा करीत असून त्यांच्यावर कारवाई करण्याचे निवेदन दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास अखिल भारतीय छावा संघटनेने जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडे दिले, हे खरे आहे काय,

(२) पूर्णा नदी पात्रासह (ता.जळगांव-जामोद, जि.बुलढाणा) इतर ठिकाणी वाळू माफियांनी केलेल्या अवैध वाळू उत्खननावर दिनांक ४ नोव्हेंबर, २०१४ ते ३० डिसेंबर, २०१४ या कालावधीत २४ वाळू तस्करांवर दंड केलेल्या २,०३,७००/- रुपयांपैकी शासनाच्या तिजोरीत प्रत्यक्ष मात्र केवळ ८७,०००/- रुपयांचाच भरणा करण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४) व (५) जालना जिल्ह्यातील अंबड व घनसावंगी तालुक्याच्या संदर्भात अशा स्वरुपाचे निवेदन अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटनेने जिल्हाधिकारी, जालना यांना दिनांक १०/१२/२०१४ रोजी निवेदन दिले हे खरे आहे, सदर निवेदनाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत चौकशी करण्यात येत आहे. तसेच गौण खनिजाची अवैध उत्खनन व वाहतुक रोखण्यासाठी जिल्हा, उपविभाग व तालुका स्तरावर गठीत करण्यात आलेल्या भरारी पथकांद्वारे दिनांक १०/१२/२०१४ ते दिनांक ३१/०३/२०१५ या कालावधीत ६२ प्रकरणात रुपये ६,२४,३५०/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

जळगांव जामोद तालुक्यात दि. ४ नोव्हेंबर, २०१४ ते दि. ३० डिसेंबर, २०१४ या कालावधीत पूर्णा नदी पात्रातून अवैध वाळू वाहतुकीच्या २१ प्रकरणात रुपये १,९८,३००/- इतका दंड आकारण्यात आला असून त्यापैकी रुपये ८०,४००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. दंडाच्या उर्वरित रक्कमेच्या वसूलीची कार्यवाही प्रगतीपथावर असून, संबंधितांच्या गाव नमूना नंबर ७/१२ वर बोजा चढविण्याबाबत निर्देशित केले आहे.

**बेलवंडी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) परिसरातील शेती महामंडळाची जमीन चुकीच्या पध्दतीने उद्योगपतीला दिल्याबाबत**

**(१६) * १११७९ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलवंडी (ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर) परिसरातील शेती महामंडळाची सुमारे १३०० एकर जमीन शेतकऱ्यांना भाडे तत्वावर देण्याऐवजी एका मोठ्या उद्योगपतीला चुकीच्या करार पध्दतीने दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेती महामंडळाच्या या चुकीच्या निर्णयाविरोधात बेलवंडी आणि लोणी व्यंकनाथ परिसरातील संतप्त शेतक-यांनी दिनांक २२ डिसेंबर, २०१४ पासून उपोषण सुरु केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना भाडे तत्वावर जमीन देण्याऐवजी एका उद्योगपतीला जमीन देण्याची कारणे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शेतकऱ्यांना जमीन पुन्हा भाडेतत्वावर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या बेलवंडी परिसरातील शेतमळ्यासंदर्भात नियमानुसार निविदा प्रक्रिया राबवून संयुक्त शेती करीता श्रीकृष्ण इंडस्ट्रीज, औरंगाबाद यांच्यासोबत जानेवारी, २०१५ मध्ये करारनामा करण्यात आला आहे. सदर निविदा प्रक्रियेत शेती करण्यात इच्छुक व्यक्तींनी देखील सहभाग घेतला होता. मात्र त्यांचे देकार कमी असल्याने त्यांच्या निविदा स्वीकारण्यात आल्या नाहीत.

सदर निर्णयाच्या विरोधात बेलवंडी व लोणी व्यंकनाथ परसरातील शेतक-यांनी दि. २२ डिसेंबर, २०१४ रोजी एक दिवसाचे उपोषण केले होते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दारिद्रयरेषेखालील नागरिकांना केंद्र शासनाच्या राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेतील लाभार्थ्यांवर महावितरणकडून थकबाकी लादली जात असल्याबाबत

**(१७) * १५७४३ श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारिद्रयरेषेखालील नागरिकांना केंद्र शासनाच्या राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेतून फक्त १५ रूपयांत वीज कनेक्शन दिले जाते या योजनेतंर्गत २०१० मध्ये वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील निमगाव येथील इंदिरा नगरमध्ये वीज कनेक्शन देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेतंर्गत वीज जोडणी न देताच वैजापूर तालुक्यातील निमगाव येथील दारिद्रयरेषेखालील १९ कुटूंबावर महावितरणाने थकबाकी लावली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज जोडणी न देताच थकबाकी देण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तदनुसार यास जबाबदार असणा-या संबंधित व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील मौजे निमगावच्या इंदिरानगर येथील दारिद्र्यरेषेदखालील नागरिकांना केंद्र शासनाच्या राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेअंतर्गत सन २०१० ते २०१२ या कालावधीत वीज कनेक्शन देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

(२) नाही, सदर योजनेअंतर्गत वैजापूर तालुक्यातील निमगाव येथील इंदिरानगर येथे १२ कुटूंबांना वीज कनेक्शन देण्यात आले व त्यानंतर त्यांचे विद्युत देयके चालू करण्यात आले परंतु संबंधित ग्राहकांनी नियमित वीज देयके भरणा न केल्यामुळे त्यांचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला आहे. उर्वरित ७ कुटूंबांनी रुपये १५ चा फर्म कोटेशन चा भरणा न केल्यामुळे त्यांना विद्युत पुरवठा करण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजा नादंगाव पेठ (जि.अमरावती) येथील तलावातून मोठ्या प्रमाणात गौण खनिजांची चोरी होत असल्याबाबत

**(१८) * १६०५१ श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा नादंगाव पेठ (जि.अमरावती) स्थित ब्रिटिशकालीन तलावातून तसेच इतर तलावातून जिल्हा परिषदेची कुठल्याही प्रकारची परवानगी न घेता मोठ्या प्रमाणात गौण खनिजाचे उत्खनन सुरु असल्याचे दिनांक २४ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाखो रुपयांच्या गौण खनिजाची चोरी होत असल्याबाबत अमरावती जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे तक्रार करुनही उत्खनन सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने यासंदर्भात चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांविरुध्द व तक्रारीकडे लक्ष न देणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) मौजे नांदगाव पेठ (ता.अमरावती) येथील ब्रिटीशकालीन तलावातून विना परवाना गौण खनिज उचल करण्यात येत असल्याची तक्रार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता, नांदगाव पेठ ग्रामपंचायतीने ना हरकत दिल्यानुसार व तहसिलदार, अमरावती यांनी नियमानुसार स्वामीत्वधनाची रक्कम शासनजमा करुन घेऊन, नांदगाव पेठ पाझार तलावातुन गाळ काढण्याची परवानगी दिली असल्याचे आढळून आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एकलहरे (ता.जि.नाशिक) येथील ६६० मेगॉवॅट विद्यूत निर्मिती प्रकल्प तातडीने कार्यान्वित करण्याबाबत

**(१९) * १६२३७ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकलहरे (ता.जि.नाशिक) येथे ६६० मेगावॅट विद्यूत निर्मिती प्रकल्प उभारला जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पामुळे नाशिक जिल्हा लोडशेडिंग मुक्त होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पास सन २०११-१२ मध्ये मंजूरी मिळाली असून तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार निवेदने देऊनही सदर प्रकल्प कार्यान्वित करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रोजगार निर्मितीक्षम व शेतक-यांच्या हिताचा हा प्रकल्प असल्याने तात्काळ कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सदर ठिकाणी प्रकल्प प्रस्तावित आहे.

(२) सदर प्रस्तावित प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर राज्याच्या विद्युत निर्मिती क्षमतेत वाढ होणार आहे. मात्र राज्यातील सर्व वीज निर्मिती प्रकल्पांपासूनची उपलब्ध वीज विद्युत प्रणालीद्वारे संपुर्ण राज्यात वितरीत करण्यात येत असून कोणत्याही वीज निर्मिती प्रकल्पाच्या कमी अथवा अधिक उपलब्धतेमुळे त्या भागाच्या वीजेच्या उपलब्धतेवर परिणाम होत नाही.

(३) व (४) सदर प्रस्तावित प्रकल्पाच्या सद्यस्थितीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींना अवगत करण्यात आले आहे.

कोळशाच्या उपलब्धतेबाबतची अनिश्चितता, चिमणी/धुरांडे बांधकामास ना-हरकत परवाना, पर्यावरणाशी संबंधित ना-हरकत परवाना आणि इतर वाणिज्यिक, तांत्रिक व प्रशासकीय बाबींची पुर्तता होण्यानुषंगाने कार्यवाही चालू आहे. या बाबींची पूर्तता झाल्यानंतर सदर प्रस्तावित प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शक्ती मिलचा साडेसहा एकरांचा भूखंड शासनाच्या हातातून निसटण्याची शक्यता असल्याबाबत.

**(२०) * ११८८२ श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील महालक्ष्मी येथील सुमारे साडेसहा एकराचा भूखंड सन १९३५ मध्ये शासनाने शहापूरजी बरुचा मिल्सला औद्योगिक वापरासाठी ५० वर्षाच्या भाडेपट्टा करारांवर दिला होता, मात्र ही मिल दिवाळखोरीत गेल्यानंतर सन १९५१

मध्ये सदरहू भूखंड शक्ती मिलला देण्यात आला, शक्ती मिलही तोट्यात गेल्यामुळे सन १९८१ मध्ये ती मिल बंद करण्याबाबत उच्च न्यायालयात अर्ज दाखल केल्यानंतर त्यावेळी तो अर्ज मान्यही झाला, हे खरे आहे काय,

(२) सदरहू भूखंड शासनाची कोणतीही परवानगी न घेता गहाण ठेवून शक्ती मिलने पंजाब नॅशनल बॅंकेकडून १० कोटीचे कर्ज घेतले ही बाब न्यायालयापुढे आणण्यात आली नाही, असा प्रतिकुल अहवाल जिल्हाधिकारी, मुंबई यांनी दिल्यानंतर तत्कालीन महसूल मंत्री यांनी ह्या भूखंडाचा भाडेपट्टा रद्द करुन भूखंड ताब्यात घेण्याचे आदेश देऊन या भूखंडाचा सार्वजनिक वापर करण्याचेही प्रस्तावित केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून अंमलबजावणी न झाल्यामुळे बाजार भावाप्रमाणे रु. १ हजार कोटीचा हा भूखंड शासनाच्या ताब्यातून जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) होय,

(३) व (४) नाही,

तत्कालीन मा. मंत्री (महसूल) यांच्या दिनांक १०.०८.२०१४ च्या आदेशान्वये प्रश्नाधीन भूखंडाच्या अधिकार अभिलेखातून मे. शक्ती मिल्स लि. यांचे नाव कमी करण्यात आले असून दिनांक २५.०८.२०१४ रोजी सदर जागेचा एकतर्फी ताबाही घेण्यात आला. परंतु यासंदर्भातील रिट याचिका क्रमांक (एल) २३७२/२०१४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक १५.०९.२०१४ चे आदेशान्वये, पुढील कोणतेही आदेश पारित करु नयेत, असे आदेश दिले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यात तापी नदीतून होणारा वाळू उपसा बंद करण्याबाबत**

**(२१) * १५९६६ श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातून जाणा-या तापी नदीतून मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा करण्याबाबत शासन दरवर्षी ठेका देत असून त्यातून कोटयवधी रुपयांचा महसूल शासनाला मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातत्याने वाळू उपसा होत असल्याने तापी नदीच्या काठावरील गावांना मोठा धोका निर्माण झाला असून नदीचे पात्र वाळू उपसामुळे खोल गेल्याने दोन्ही जिल्ह्यातील रस्त्यांची स्थिती बिघडली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वाळू उपसावर बंदी घालावी अशी मागणी जिल्हाधिकारी, धुळे आणि नंदुरबार यांच्याकडे सातत्याने विविध सामाजिक संघटना आणि राजकीय पक्षांनी वारंवार केली आहे, याबाबत अनेकदा मोर्चे काढून आंदोलने देखील केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त दोन्ही जिल्ह्यातून वाळूचा उपसा कायमचा बंद करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) धुळे व नंदुरबार जिल्ह्यात शासन निर्णय दिनांक १२/०२/२०१३ मधील तरतुदीनुसार वाळू/रेती उत्खननासाठी योग्य असलेल्या वाळू/रेती घाटांचा लिलाव ई-टेंडरिंग/ई-ऑक्शनद्वारे करण्यात येतो. त्यातून शासनास महसूल प्राप्त होतो, हे खरे आहे.

(२) वाळूच्या उत्खननामुळे तापी नदीकाठावरील गावाना धोका झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. वाळू/रेती वाहतुकीमुळे काही प्रमाणात रस्ते खराब होतात ही वस्तुस्थिती आहे. मात्र खनिज विकास निधीतून ग्रामपंचायतींना रस्ते दुरुस्तीसाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते.

(३) होय, धुळे व नंदुरबार जिल्ह्यात वाळू उपसा बंद करण्याबाबत लोकप्रतिनिधींची निवेदने प्राप्त झाली आहेत.

(४) व (५) वाळू/रेती उत्खननापुर्वी संबंधित ग्रामसभेची तसेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांनी ना-हरकत घेण्यात येते. त्यानंतर वाळू/रेती गटातून वाळू उत्खननासाठी पर्यावरण अनुमती प्राप्त झालेल्या वाळू रेती गटांचे लिलाव करण्यात येतात. राज्याच्या पायाभूत सुविधांच्या कामासाठी वाळू हा घटक अनिवार्य आहे, ही वस्तुस्थिती आहे या पर्श्वभूमीवर वाळू उपसा बंद करणेबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

**मौजे विटाळी (ता.अकोट, जि.अकोला) येथे विजेच्या खांबाला असलेल्या तणाव दोरास स्पर्श होऊन महिलेचा झालेला मृत्यु**

**(२२) * १५६८२ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे विटाळी (ता.अकोट जि.अकोला) येथे विजेच्या खांबाला असलेल्या तणाव दोरास स्पर्श झाल्याने शॉक लागून श्रीमती पंचफुला देवराव इंगळे ह्या महिलेचा दिनांक १७ फेब्रुवारी, २०१५ रोजी मृत्यु झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच सदर कुटूंबास नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, भविष्यात अशा अपघाताची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून कोणती खबरदारी घेण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.

(२) होय.

(३) चौकशीअंती महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून कोणताही कर्मचारी दोषी असल्याचे आढळून आले नाही. विद्युत निरीक्षक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, अकोला यांच्या दिनांक २३.३.२०१५ च्या अंतिम अहवालानुसार वीज वितरण कंपनीची सदोष वीज संच मांडणी व संरक्षण योजना कारणीभूत असल्याचे नमूद केले आहे. अपघातग्रस्तांच्या वारसांना तत्कालीन मदत रु.२०,०००/- धनादेशाद्वारे दिनांक २३.३.२०१५ रोजी देण्यात आली. संबंधितांकडून आवश्यक ती कागदपत्रे प्राप्त होताच महावितरणच्या नियमाप्रमाणे अंतिम मदत देण्यात येईल.

(४) खबरदारीच्या उपाय म्हणून वीज वाहिन्या सक्षम व सुरक्षित ठेवण्याकरिता संबंधित अधिकारी व कर्मचा-याना निर्देशित करण्यात आले आहे.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.